ePaper
‖ वर्ष - 8 । अंक -198 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

## देशातील पहिली ‘मोबाइल फॉरेन्सिक व्हॅन’ राज्यात सुरू : देवेंद्र फडणवीस



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com ‖ मंगळवार, दिनांक 28 जानेवारी 2025 ‖ पुणे आवृत्ती ‖ mahaenews.com ‖ maha_enews ‖ Mahaenews

### आतील पानांत

- मला जे करायला हवे ते मी करतो!
- बुमराहची ऐतिहासिक कामगिरी
- पोलीसला राजभवनात प्रवेश नाकारला
- वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर!

## ठाकरे गटाला महाखिंडार

# शिंदे गटाचे बळ वाढले !

### एकाच दिवशी 5 शहरात पडझड सुरुच

। मुंबई । महाईन्यूज

**विधानसभेचे निकाल विरोधात गेल्यापासून ठाकरे गटाला चांगलीच गळती लागली आहे. ठाकरे गटाला एकमागून एक धक्के बसत आहेत. आज मुंबईसह नाशिक, कोल्हापूर, सांगली आणि जळगाव या पाच शहरामध्ये ठाकरे गटात मोठी फूट पडली आहे. या पाचही बड्या शहरातील जुनेजाणते शिवसैनिक आणि असंख्य पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांचं बळ वाढलं आहे. तर ऐन महापालिका निवडणुकीच्या तोंडावर धक्क्यावर धक्के बसत असल्याने ठाकरे गटाची तारांबळ उडाली आहे.**

मुंबई महापालिकेतील ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका आणि महिला संघटक राजूल पटेल यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. याचबरोबर राज्यभरातील ठाकरे गटाच्या शेकडो पदाधिकारी आणि हजारो कार्यकर्त्यांनी धर्मवीर आनंद दिघे यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून ठाण्यातील स्वर्गीय आनंद दिघे यांचे समाधीस्थान असलेल्या शक्तीस्थळावर पक्ष प्रवेश केला. शिवसेनेचे मुख्यनेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश पार पडला.

### कुणाकुणाचा प्रवेश?

मुंबई महापालिकेच्या माजी नगरसेविका आणि ठाकरे गटाच्या महिला संघटक राजूल पटेल, विलेपार्लेचे शाखाप्रमुख सुनील भागडे, वरळीतील सुरेश कोठेकर आणि रोशन पावसकर यांच्यासह 40 पदाधिकारी आणि 50 कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. शिवाजी नगर, मानखुर्द येथील कार्यकर्ते तसेच उत्तर मध्य मुंबईमधील अशोक लोखंडे यांच्यासह 20 पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला. त्याचबरोबर मीरा भाईंदर महापालिकाचे माजी उपमहापौर प्रवीण पाटील, जयंती पाटील, अरविंद ठाकूर, शिवशंकर तिवारी यांच्यासह माजी नगरसेवकांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. या पक्ष प्रवेशाने मुंबई आणि उपनगरात शिवसेनेचे पक्ष संघटन आणखी मजबूत झाली आहे.



### पटेल यांचा अल्प परिचय

ठाकरे गटाच्या राजुल पटेल या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपनेत्या आहेत. त्या विधानसभेच्या महिला संघटक आणि माजी नगरसेविका आहेत. पक्षातील जुन्या महिला शिवसैनिक म्हणून राजुल पटेल यांची ओळख आहे. राजुल पटेल यांनी वर्सोवा विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी मागितली होती. त्यांना तिकिट नाकारण्यात आले. विधानसभा 2019ची विधानसभा निवडणूक लढवली होती.

### भगवा हाती

कोल्हापूर जिल्हातील प्रदेश जनरल सेक्रेटरी सुजीत समुद्रे, प्रमोध धनावडे, शीतल कांबळे, उल्हास वाघमारे, किरण कांबळे, यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला. सांगली जिल्ह्यातील प्रदेश जनरल सेक्रेटरी प्रशांत कांबळे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. तसेच नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, मालेगाव शहापूरमधील 200 कार्यकर्ते, उबाठाचे माजी आमदार काशिनाथ मेंगाळ यांनी आज शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेते पक्ष प्रवेश केला. याशिवाय नाशिक शिक्षक सेना, जळगाव शिक्षक सेनेतील शेकडो सदस्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला.

## मुंबई महापालिका स्वबळावर लढणार !

### अन्य ठिकाणी मविआ; संजय राऊत यांचा दावा

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईवर शिवसेना (ठाकरे) पक्षाची पकड असल्याने मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याची कार्यकर्त्यांची मागणी आहे.मुंबई वगळता अन्य महापालिका निवडणुका महाविकास आघाडी एकत्र लढविणार असल्याचे शिवसेना (ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी सांगितले.**



मूळ शिवसेना आणि राष्ट्रवादी फोडण्यात आली. त्याच पद्धतीने एकनाथ शिंदे आणि अजित पवारांचा पक्ष फोडला जाईल, असे भाकीतही त्यांनी वर्तविले. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खासदार राऊत यांनी सोमवारी पिंपरी-चिंचवडमधील पक्ष संघटनेचा आढावा घेतला. तत्पूर्वी त्यांनी हिंजवडीत माध्यमांशी संवाद साधला. खासदार राऊत म्हणाले, ‘मुंबईवर शिवसेना (ठाकरे) पक्षाची पकड आहे. ती ठेवण्यासाठी स्वबळावर लढावे, अशी शिवसैनिकांची इच्छा आहे. त्यामुळे महाविकास आघाडी तुटली किंवा संपली, असा अर्थ निघू शकत नाही. केवळ मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढविली जाईल. ही परिस्थिती संपूर्ण राज्यात नसणार आहे.

### पक्ष फोडण्याची भाजपला लागलीय चटक

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विधानसभा निवडणूक लढविल्यानंतरही त्यांना भाजपने मुख्यमंत्रीपद दिले नाही. शिंदे यांचे हायकमांड भाजप आहे. त्यांचा आदेश शिंदे यांना पाळावा लागतो. शिंदे यांच्याकडे कोणताही पर्याय नव्हता. दाखल होणारे खटले थांबविण्यासाठीच शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले, अशी टीका खासदार राऊत यांनी केली. ‘मूळ शिवसेना आणि राष्ट्रवादी फोडण्यात आली. त्याच पद्धतीने एकनाथ शिंदे आणि अजित पवारांचा पक्ष फोडला जाईल. देशभरातील पक्ष फोडण्याची भाजपला चटक लागली आहे. चंद्राबाबू नायडू, नितीशकुमार यांचेही पक्ष फोडले जातील,’ असे खासदार राऊत म्हणाले.

## फार्मसी क्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये

# सकारात्मक दृष्टिकोन हवा : डॉ. बुरांडे

### राजमाता फार्मसीमधे विद्यार्थ्यांचा समारोह उत्साहात

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**फार्मसी (औषधनिर्माणशास्त्र) हे देशातील सर्वांत विकसित आणि नैतिकदृष्ट्या आव्हानात्मक क्षेत्र आहे. फार्मसी क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन, वैयक्तिक, सामाजिक भान असणे गरजेचे आहे असे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, पुणे,चे संचालक डॉ.महेश बुरांडे म्हणाले.**




राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या डूडूळगाव शैक्षणिक संकुलातील कॉलेज ऑफ फार्मसी तर्फे (दि .२४) प्रथम वर्ष बी.फार्म,डी.फार्म व एम फार्मसीत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारोह व शपथग्रहण समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास १९० हून अधिक विद्यार्थी व पालक उपस्थित होते. समारंभाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष व भोसरी विधानसभेचे माजी आमदार विलास लांडे होते. शपथग्रहण सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, पुणे,चे संचालक डॉ.महेश बुरांडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.महेश बुरांडे यांनी फार्मसी विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन, वैयक्तिक, सामाजिक, परीसंस्थात्मक व राष्ट्रीय ध्येय कसे गाठायचे याचे उत्तम मार्गदर्शन आपल्या भाषणातून केले. तसेच कॅलेंडर प्रकाशन समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून *ड्रग डिस्कव्हरी टोरंट रिसर्च सेंटरचे ( अहमदाबाद ) संचालक डॉ.ए.बी. मांढरे उपस्थित होते. संस्थेचे दर वर्षा प्रमाणेचे अलुमणी कॅलेंडर महाविद्यालयाचे प्रा.आशिष फुगे, डॉ. प्रवीण पाटील, डॉ. निलेश जाधव , डॉ.ज्योती कदम यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच कार्यक्रमाचे नियोजन प्रा. डॉ.अमोल कुंभार , प्रा. अर्चना ठिकेकर व प्रा. योगिता आढाव यांनी केले. व्यवस्थापन प्रतिनिधी प्रा. किरण चौधरी, संस्थेचे रजिस्ट्रार अश्विनी भोसले , सचिव सुधीर मुंगसे, खजिनदार अजित दा.गव्हाणे, संस्थेचे विश्वस्त विक्रांत लांडे, विश्वस्त सुमित मुंगसे यांनी यशस्वी आयोजनाबद्दल शिक्षकांचे अभिनंदन केले. प्रा. नीलाक्षी नेरकर व अश्विनी मुळूक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ.निलेश जाधव यांनी आभार मानले.

#### फार्मसी हे दुसरे प्रगतीशील क्षेत्र

फार्मसी (औषधनिर्माणशास्त्र) हे देशातील सर्वांत विकसित आणि नैतिकदृष्ट्या आव्हानात्मक क्षेत्र आहे. फार्मसी शाखा ही आरोग्य विज्ञानातील प्रमुख शाखांपैकी एक आहे. इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी क्षेत्रानंतर फार्मसी हे दुसरे प्रगतीशील क्षेत्र ओळखले जाते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.किशोर एस.जैन यांनी औषधनिर्माण क्षेत्र यामधील उद्योजकता विकास व नावीन्यपुंर्ण प्रकल्प याबद्दल मोलाची माहिती सांगितली. तसेच राजमाता औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे वैशिष्ट्य, विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती, ई. बद्दल माहिती दिली. त्यानंतर डॉ.महेश बुरांडे यांनी फार्मसी व्यवसायाची शपथ उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.किशोर एस.जैन यांचे मार्गदर्शन लाभले.

---

## ‘मुलांनी ध्येय व उदिष्ट ठरवून त्या दिशेने वाटचाल करावी

### गायत्री इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात

। पुणे । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुलांनी ध्येय व उदिष्ट ठरवून त्या दिशेने वाटचाल करावी. अडथळयांना घाबरु नये, असे मेजर डॉ. विपुल पाटील यांनी सांगितले. गायत्री इंग्लिश मिडीयम स्कुल अँड जुनिअर कॉलेज,मोशी शाळेचा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व आनंदमयी वातावरणात सादर झाला. या कार्यक्रमास मेजर डॉ. विपुल पाटील यांची प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थिती लाभली.**




योगेश इंटरप्रायजेस चे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री .योगेश भोंगाळे यांनी उपस्थिती दाखवली. त्यांनी या प्रसंगी उपस्थित असणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले व शाळा संपल्यावरही असेच स्नेह जपावे अशी विनंती करून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी मुलांनी रोमांचक भाषणे केली तसेच देशभक्तीपर गीते प्रस्तुत केली. सूर्यनमस्कारचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले तसेच नृत्य सादर केले. MCF मध्ये प्रथम क्रमांक पटकवलेल्या मुलींचा चषक देऊन सन्मान करण्यात आला तर चित्रकला ग्रेड परीक्षाचे प्रशिस्तीपत्रक देण्यात आले. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक, पदाधिकारी, माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुलांनी ध्येय व उदिष्ट ठरवून त्या दिशेने वाटचाल करावी. अडथळयांना घाबरु नये, असे मेजर डॉ. विपुल पाटील यांनी सांगितले.

#### ‘हुनर – 2025’ प्रदर्शन...

मुलांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी ‘हुनर – 2025’ प्रदर्शन भरवण्यात आले. यामध्ये मुलांनी चित्र व विविध हस्तकलांचे सादरीकरण केले जे मुख्य आकर्षण ठरले. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी सगळ्यांना शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कविता कडू यांनी या प्रसंगी आपला अभ्यास करून कर्तव्य व्यवस्थित पार पाडून देशभक्तीचे प्रदर्शन घडवावे असे सुचवले.

## GUILLAIN - BARRE SYNDROME चे संकट

# पाणी नमुन्यांची होणार तपासणी!

### आयुक्त शेखर सिंह यांचे निर्देश : वैद्यकीय आणि पाणीपुरवठा विभागाची संयुक्त बैठक

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरात GUILLAIN - BARRE SYNDROME आजाराचे आजअखेर १५ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. या पार्श्वभूमीवर दुषित पाण्याद्वारे आजाराचा प्रसार होण्याची शक्यता गृहीत धरून शहरातील खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करणाऱ्या तसेच पिण्याचे पाणी जारद्वारे वितरीत करणाऱ्या पाणी नमुन्यांची तपासणी करण्याचे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले.**



आयुक्त शेखर सिंह यांनी आज वैद्यकीय आणि पाणीपुरवठा विभागाची संयुक्त बैठक घेऊन आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात झालेल्या या आढावा या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत सुपेकर, पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता अजय सुर्यवंशी, चीफ केमिस्ट डॉ. प्रशांत जगताप व विशेष अधिकारी किरण गायकवाड आदी उपस्थित होते.

Guillain - Barre Syndrome या आजारामध्ये बाधित रुग्णांची प्रतिकारशक्ती मज्जातंतूवर आघात होऊन हा आजार संभावतो. या आजाराची लागण सर्व वयोगटातील व्यक्तींना होऊ शकते. अत्यल्प रूग्णांमध्ये गंभीर स्वरुपाची लक्षणे आढळून येतात. दुषित पाण्याद्वारे या आजाराची बाधा होण्याची शक्यता गृहीत धरून महापालिकेने त्या दृष्टीने उपाययोजना सुरु केल्या आहेत. महापालिकेचा पाणीपुरवठा होत असताना कोणत्याही परिस्थितीत दुषित पाण्याचा शिरकाव होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश संबधित विभागांना देण्यात आले आहेत. या आजाराची प्राथमिक लक्षणे आढळलेले संशयित रुग्ण ज्या भागात वास्तव्य करतात त्या परिसरात महापालिकेच्या नळाद्वारे पुरविल्या जाणा-या पाण्याचे नमुने तपासण्याची मोहीम तीव्र करण्याच्या सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी दिल्या.

याशिवाय खाजगी विहिरी तसेच बोरवेल व टँकर मार्फत पिण्यासाठी वापरल्या जाणा-या पाण्याचे नमुनेही तपासण्यात यावेत असेही आयुक्त सिंह यांनी सांगितले आहे. अशा विहिरींची माहिती संकलित करून महापालिकेच्या पथकाद्वारे अशा ठिकाणांना भेटी देऊन त्या पाण्याचे नमुने तपासावेत. दुषित पाणी आढळून आल्यास त्याठिकाणी तात्काळ उपाययोजना कराव्यात अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

या आजारावर उपचारासाठी आवश्यक असणारे औषधोपचार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी येथील कै. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व इतर रुग्णालयांत उपलब्ध आहेत. तसेच या आजाराचे उपचार "एकत्रित महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना" मध्ये समाविष्ट असून वायसीएम रुग्णालय आणि नवीन थेरगाव रुग्णालयामध्ये या योजनेअंतर्गत रुग्णांकरिता मोफत उपचार उपलब्ध आहेत.

### 3 हजार 986 घरे तपासण्यात आली...

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात आजअखेर Guillain-Barre Syndrome आजाराचे संशयीत रुग्ण १५ आहेत. तसेच सर्व दाखल रुग्णांची प्रकृती स्थिर आहे. या आजाराचे रुग्ण आढळून आलेल्या परिसरात सर्वेक्षण करण्याकरिता ८ रुग्णालय झोन अंतर्गत प्रत्येकी दोन असे एकूण १६ पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांमार्फत आजअखेर ३ हजार ९८६ घरे तपासण्यात आली असून यामध्ये Guillain - Barre Syndrome आजाराचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही.

> Guillain - Barre Syndrome आजार हा नवीन नसुन यापूर्वीही या आजाराचे रुग्ण काही प्रमाणात आढळून आलेले आहेत. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये. परंतु हातापायातील ताकद कमी होणे, हातापायाला मुंग्या (tingling sensations) येणे, गिळण्यास व बोलणेस त्रास होणे, धाप लागणे/श्वास घेण्यास त्रास होणे अशी लक्षणे आढळून आल्यास त्वरित मनपाच्या नजीकच्या रुग्णालयात तज्ञांचा सल्ला घ्यावा. तसेच पिण्याचे पाणी उकळून गार करून प्यावे व उघड्यावरील व न शिजविलेले अन्न खाऊ नये.
> **-डॉ. लक्ष्मण गोफणे,** आरोग्य वैद्यकीय अधिकारी.

---

## एस. बी. पाटील पब्लिक स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात

### उद्योजक शंतनु प्रभुणे, सोनाली प्रभुणे यांच्या हस्ते ध्वजारोहण

। जुनी सांगवी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस.बी. पाटील पब्लिक स्कूल येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**

उद्योजक शंतनु प्रभुणे, सोनाली प्रभुणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. संगीत शिक्षिका सुलोचना पवार यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्या डॉ. बिंदु सैनी, उपमुख्याध्यापिका पद्मा बंडा, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी यांनी स्वागत केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. शिक्षिका भारती कबीर यांनी देशभक्तीपर हिंदी गीत सादर केले. शिक्षिका जीली अँथनी यांनी आभार मानले.



# पुरस्कार मनोहरपंतांना, डिवचले उद्धवपंतांना !



## 'स्टेट'मेंट

**अधिकराव दिवे-पाटील**

**संस्थापक, संपादक**

**प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्राची पद्म पुरस्कारांची यादी जाहीर झाली, अन् महाराष्ट्राच्या राजकारणात अनेकांच्या भुवया उंचावल्या. अर्थात् त्याची जाहीर वाच्यता झाली नसली तरी, दिवंगत मुख्यमंत्री मनोहरपंत जोशी यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवण्यात आल्याचे उद्धव ठाकरे यांच्या गटाला मुळीच आवडलेले नसणार ! एका अर्थाने भारतीय जनता पार्टीने मनोहरपंतांना हा पुरस्कार देऊन उद्धवपंतांना आणि त्यांच्या शिवसेनेला चांगलेच डिवचले आहे, हे प्रत्येक राजकारणाच्या लक्षात आले असणार...**

एकेकाळी, मनोहर जोशी हे शिवसेनेमधील मोठे नाव. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यानंतरचा मोठा नेता म्हणजे मनोहर जोशीसर! भाजपा आणि शिवसेनेची सत्ता ज्यावेळी महाराष्ट्रामध्ये आधी त्यावेळी मुख्यमंत्री होण्याचा मान बाळासाहेबांनी मनोहर जोशींनाच दिला होता. जोशी नावाच्या या दिग्गज नेत्याचे पंख कापण्याचे काम ज्यावेळी उद्धव ठाकरे शिवसेनेचे पक्षप्रमुख झाले त्यावेळी त्यांच्या चेल्यांनी केले, हे देखील सर्वांना माहीत आहे. नंतरच्या काळात शिवसेनेमध्ये एकाकी पडलेल्या मनोहर जोशींना क्षणोक्षणी अपमानित केले गेले. एवढेच काय, शिवसेनेच्या दसरा मेळाव्यात व्यासपीठावरून त्यांनी निघून जाण्यापर्यंतची तयारी उद्धवपंतांच्या अनुयायांनी केली.. त्यांना अक्षरशः हाकलून लावले, हा इतिहास अगदी ताजा आहे. म्हणूनच म्हणावेसे वाटते, की मनोहरपंतांचा गौरव करून भाजपाने उद्धवपंत आणि शिल्लक सेनेची नांगी ठेचली आहे. मनोहर जोशी यांना हा पुरस्कार मरणोत्तर दिला जाणार असल्याचे वाचले. तसे पाहिले तर पटकन विश्वासच बसला नाही. हे मनोहर जोशी म्हणजे आपले दिवंगत शिवसेना नेते, माजी मुख्यमंत्री, माजी विरोधी पक्षनेते, माजी केंद्रीय अवजड उद्योग मंत्री आणि माजी लोकसभा अध्यक्ष मनोहर गजानन जोशी हेच असल्याचे जेव्हा मनाने निश्चित केले तेव्हा, समजून चुकलो, की भाजपाने उद्धवपंतांची ठासली पुरस्काराला जरा उशीरच तसे पाहिले तर, जोशी सरांना हा पुरस्कार खूप आधीच मिळायला हवा होता. मात्र, त्यांच्या उतरत्या दिवसात शिवसेना पक्षातच त्यांना अपमानित केले गेले आणि त्यामुळे ते उद्विग्न होऊन राजकीय जीवनापासून निवृत्त झाले होते. मरणोत्तर पद्मभूषण पुरस्कार देऊन केंद्र सरकारने त्यांच्या कार्याचा गौरव तर केला आहेच, पण त्यांचा अपमान करणाऱ्या उद्धवपंत ठाकरे यांना भाजपाच्या मोदी सरकारने सणसणीत चपराकही लावली आहे.

### प्रयोगशील यशस्वी मुख्यमंत्री

जोशीसर हे शिवसेनेचे एका काळातले पहिल्या फळीतले नेते. शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे



यांच्याशी संपर्क आल्यामुळे ते शिवसेनेत आले आणि बाळासाहेबांचे अत्यंत विश्वासू शिवसैनिक बनले. ते मुंबईचे महापौर बनले. नंतर आधी विधान परिषदेत आणि नंतर विधानसभेत सदस्य म्हणून गेले. काही काळ ते विधानसभेचे विरोधी पक्षनेते देखील होते. १९९५ मध्ये महाराष्ट्रात शिवसेना, भारतीय जनता पक्ष युतीचे सरकार आले, तेव्हा पहिल्यांदाच ते महाराष्ट्रातील गैर काँग्रेसी मुख्यमंत्री बनले, एवढा बाळासाहेबांचा त्यांच्यावर विश्वास होता. मुख्यमंत्रीपदाच्या काळात त्यांनी अनेक नवे प्रकल्प राबवले. महाराष्ट्रात एक रुपयात झुणका भाकर देण्याचा प्रयोग त्यांनी सर्वप्रथम यशस्वी केला. मुंबई, पुणे द्रुतगती महामार्गाची उभारणी त्यांच्याच काळात झाली. कृष्णा खोरे सिंचन विकास मंडळ स्थापन करून कृष्णा खोऱ्याचे पाणी अडवण्याचा यशस्वी प्रयोग त्यांनी केला. त्याच धर्तीवर मराठवाडा सिंचन विकास मंडळ आणि विदर्भ सिंचन विकास मंडळ हे देखील त्यांनी स्थापन केले आणि तिथलेही दीर्घकाळ प्रलंबित असलेले सिंचन प्रकल्प मार्गी लावले होते. एक प्रयोगशील मुख्यमंत्री म्हणून ते चांगलेच गाजले होते, त्यांचा गाजावाजा संपूर्ण देशभर झाला.

### लोकसभेच्या सभापतीपदी वर्णी

आजही स्पष्टपणे आठवते, की १९९९ मध्ये ते दादर लोकसभा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले. लगेचच केंद्रातील अटल बिहारी वाजपेयी सरकार मध्ये ते अवजड उद्योग मंत्री बनले. तिथेही आपल्या प्रयोगाशील व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर त्यांनी केंद्रात आपले स्थान निर्माण केले. तत्कालीन लोकसभा सभापती बालयोगी यांचे अपघातात निधन झाले असता रिक्त जागेवर ते लोकसभेचे सभापती म्हणून निवडून गेले होते.

### उद्धव ठाकरेंची चलती, जोशी सरांची पीछेहाट

यानंतर दादरमधून लोकसभेला पराभूत होण्याची वेळ जोशीसरांवर आली.नंतर जोशीसर सहा वर्षे राज्यसभेवर शिवसेनेचे प्रतिनिधी म्हणून निवडून गेले. राज्यसभेची मुदत संपल्यावर सर शिवसेनेच्या कामातच सक्रिय झाले होते. याच दरम्यान बाळासाहेबांचे निधन झाले. नंतर उद्धव ठाकरेंचे राज्य सुरू झाले. या काळात मनोहर जोशी शिवसेनेच्या पहिल्या फळीतून काहीसे दूर फेकले गेले, उद्धव ठाकरे यांच्या नव्या चौकडीने जोशीसरांना बाजूला काढले. त्यातच शिवसेनेच्या शिवाजी पार्कवरील एका मेळाव्यात त्यांना अपमानित करून व्यासपीठावरून खाली उतरवण्यात आले. तेव्हापासून ते चांगलेच दुखावले गेले होते. तेव्हापासूनच त्यांनी सक्रिय राजकारणातून काहीशी निवृत्त घेतली, त्यांनी मूळ शिवसेनेच्या प्रवाहातून बाजूला होण्याचा निर्णय घेतला. ते पूर्ण विजनवासात गेले आणि गेल्या वर्षी दि.२३ फेब्रुवारी २०२४ला सकाळी सर गेल्याचीच बातमी आली.


### दिलदार आणि जिंदादिल व्यक्तिमत्व

जोशी सर म्हणजे एक आगळे वेगळे जिंदादिल व्यक्तिमत्व! त्यांची कदर स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी केली. त्याचप्रमाणे जोशीसरांनीही शिवसेना वाढवण्यासाठी तन-मन-धनाने प्रयत्न केले. मात्र, बाळासाहेबांच्या पुढच्या पिढ्यांनी त्यांची कदर केली नाही. त्यांचा उपयोग तर करून घेतला नाहीच, पण त्यांना अपमानित करून बाजूला लोटले. वस्तूतः, शिवसेनेनेच त्यांना सन्मानित करून त्यांना पद्म पुरस्कार द्यावा, यासाठी पंतप्रधानांकडे शिफारस करायला हवी होती, मात्र, ती दानत उद्धव ठाकरे यांच्या गटाकडे नाही, हे दुर्दैव !

पण, देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांनी त्यांची कदर करून मनोहर जोशीसरांना मरणोत्तर का होईना पण पद्मभूषण पुरस्कार दिला आहे. त्याबद्दल केंद्र सरकारही अभिनंदनास पात्र आहे, हे निश्चित.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सध्या शिल्लक असलेल्या शिवसेनेला आणि त्यांच्या नेतृत्वाला केंद्र सरकारने दिलेली सणसणीत चपराक आहे. तुम्ही एका हिऱ्याला दूर लोटले आणि त्याचा अपमान केला. मात्र आम्ही त्याची कदर केली आहे हे दाखवून दिले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेना आणि भारतीय जनता पार्टी एकेकाळी जवळचे होते आणि युती करूनच लढत होते. गेल्या काही दिवसात दोघांमध्ये कुरघोडीचे राजकारण सुरू झाले आहे. या नव्या राजकारणात भाजपाने उद्धव ठाकरे यांचा पक्ष पूर्णपणे मोडीत काढून प्रचंड सूड उगवला आहे. उद्धव ठाकरेंना तोंडावर पाडण्याची एकही संधी भाजपा सोडत नाही. त्याच कुरघोडी चा भाग म्हणून मनोहरपंतांचा गौरव आणि त्या माध्यमातून उद्धवपंतांना मोठी चपराक, असे हे राजकारण नक्की आहे. पण, यामुळे जोशीसरां सारख्या योग्य राजकारण्याचा प्रतिष्ठेच्या राजकारणाचा गौरव झाला, हे मात्र मान्य करायलाच हवे !

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



श्रीब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर

सर्व साधनांत श्रेष्ठ साधन नामस्मरणच आहे. पण त्याचे महत्त्व कळत नाही. ते कळायला खरोखर भगवत्कृपाच पाहिजे. आपल्या शरीरात मुख्य जसे हृदय, आणि बाकीचे अवयव गौण आहेत, तसे परमार्थात मुख्य साधन नामस्मरण हे आहे आणि दुसरी साधने गौण आहेत. नाम हे मंगलांत मंगल आणि अत्यंत पवित्र आहे. आपले जीवन देवाच्या हाती आहे, आणि देव नामाच्या स्वाधीन आहे हे पक्के लक्षात ठेवा. योगात, योग करीपर्यंतच समाधान असते; पण नामस्मरणाच्या अनुसंधानात सतत समाधान असते. स्वत: निर्गुण झाल्याशिवाय निर्गुण उपासना होत नाही. तेज दिसणे, नाद ऐकणे, या सर्व गोष्टी गुणातच नाही का आल्या ? निर्गुण व्हायला देहबुद्धी सुटायला पाहिजे. सर्वव्यापी परमेश्वराला सर्वांभूतीं पाहणे ही निर्गुण उपासनाच होय. योग नामस्मरणाला पोषक तितकाच करावा; केवळ त्यालाच प्राधान्य देऊ नये. योग नामस्मरणाला पोषक आहे, पण नामस्मरण योगाच्या पलीकडे आहे; म्हणून नामस्मरणात योग येतो, योगात नामस्मरण येत नाही. सर्व साधनांचा अंत नामस्मरणात आहे. नामाचे साधन हे जलद गाडीप्रमाणे आहे. रंग दिसणे, प्रकाश दिसणे, आवाज ऐकू येणे ही मधली स्टेशने सोडून नाम एकदम भगवंतापर्यंत नेऊन पोहोचवते. इतर साधनांनी लवकर साधल्यासारखे वाटेल, पण ते तात्पुरते असते. नामाने थोडा उशीर लागेल, पण जे साधेल ते कायमचे साधेल, कारण नामाने मुळापासून सुधारणा होते. नामस्मरण हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग होय. नामात एका आनंदाशिवाय दुसरे काही नाही. नामाच्या आनंदाचा झटका आला की मनुष्य स्वत:ला विसरेल. तुकारामबुवांची वाचा त्यांना अनावर झाली, ती सारखी नाम घेऊ लागली; याचा अर्थ असा की, त्यांच्या कल्पनेच्या बाहेर नाम येऊ लागले. गाडी उताराला लागली की जशी अतिवेगात येते आणि आवरत नाही, तसे हे आहे. आपल्या शक्तीच्या बाहेर कार्य होणे ही भगवंताची कृपा होय.

चार माणसे होती, त्या सर्वांना एकच रोग झाला होता. पण त्यांची सांपत्तिक स्थिती सारखी नव्हती. वैद्याने त्यांपैकी अगदी गरीब माणसाला एक औषध तुळशीच्या रसात घ्यायला सांगितले, त्याच्यापेक्षा पैसेवाल्याला तेच औषध मधात घ्यायला सांगितले, त्याच्याहीपेक्षा पैसेवाल्याला तेच औषध केशरात घ्यायला सांगितले, आणि सर्वांत श्रीमंत होता त्याला तेच औषध कस्तुरीत घ्यायला सांगितले. त्याचप्रमाणे, ज्याचा जसा अधिकार तसे त्याने नाम घ्यावे. नाम नुसते तोंडाने घ्यावे, नाम श्रद्धेने घ्यावे, नाम वृत्ती सांभाळून घ्यावे, नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही, अशा दृढ भावनेने घ्यावे; सर्वांना फळ सारखेच मिळेल.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सोयाबीन खरेदीत महाराष्ट्र अव्वल!

## 7 लाख 81 हजार 447 मेट्रिक टन सोयाबीन खरेदी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**हमीभावाने सोयाबीन खरेदीत राज्याने आघाडी घेतली आहे. मध्य प्रदेशला मागे टाकून महाराष्ट्राने पहिला क्रमांक पटकाविला आहे. सोमवारअखेर (२७ जानेवारी) राज्यातून सर्वाधिक ७ लाख ८१ हजार ४४७ टन सोयाबीनची खरेदी झाली आहे. गरज पडल्यास खरेदीची मुदत वाढवून घेतली जाईल, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली आहे.**



पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले, राज्यात नोंदणी झालेल्या ७ लाख ६४ हजार ७३१ शेतकऱ्यांपैकी ३ लाख ६९ हजार ११४ शेतकऱ्यांकडून ७ लाख ८१ हजार ४४७ मेट्रिक टन सोयाबीन खरेदी झाली आहे. ही खरेदी इतर राज्यांच्या तुलनेने सर्वाधिक आहे. देशातील मध्य प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, गुजरात, तेलंगणा या राज्यांना मागे टाकत महाराष्ट्रात देशांमध्ये सर्वाधिक सोयाबीन खरेदी झाली आहे.अनेक जिल्ह्यांनी आपले खरेदी उद्दिष्ट पूर्ण केले आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याला अडचण येऊ नये यासाठी वेगाने सोयाबीन खरेदी प्रक्रिया करण्याची तसेच दोन ते तीन दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा होईल, या संदर्भात वेगाने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ३१ जानेवारी २०२५ पर्यंत खरेदी चालू राहणार असल्याने सोयाबीन खरेदीच्या आकडेवारीत मोठी वाढ दिसेल.

तथापि, सोयाबीन खरेदीची मुदत वाढवण्याची गरज भासल्यास केंद्र सरकारकडे मुदत वाढवून मागितली जाईल, असेही रावल म्हणाले.राज्यात नाफेड व एनसीसीएफ अंतर्गत सहा राज्यस्तरीय नोडल एजन्सीच्या माध्यमातून सोयाबीन खरेदी सुरू आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची १ ऑक्टोबर २०२४ पासून नोंदणी सुरू केली होती. त्यानुसार १५ ऑक्टोबर २०२४ पासून राज्यातील ५६२ खरेदी केंद्रांवर प्रत्यक्ष खरेदी सुरू करण्यात आली आहे. नोंदणी करता येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे नोंदणीची मुदत एक वेळा वाढवली.

त्यानंतर सुरुवातीला सोयाबीन खरेदीची मुदत १२ जानेवारी २०२५ पर्यंत होती, मात्र या मुदतीत अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी न झाल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंग चौहान यांना विनंती करून खरेदीची मुदत ३१ जानेवारीपर्यंत वाढवली आहे. मध्य प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, गुजरात, तेलंगणा या प्रमुख सोयाबीन उत्पादक राज्यात खरेदीच्या तुलनेत महाराष्ट्राने आतापर्यंत सर्वाधिक खरेदी केली आहे. या सहा राज्यांची एकूण खरेदी १८ लाख ६८ हजार ९१४ टन इतकी झाली असून, यापैकी महाराष्ट्रात सर्वाधिक ७ लाख ८१ हजार ४४७ टन खरेदी झाली आहेखाद्यतेलाच्या आयातीवर शुल्क लागू केल्यानंतरही अपेक्षित दरवाढ झाली नाही, अशी कबुली देतानाच आता उत्पादीत झालेल्या सर्व तूर, उडीद, मसूर या कडधान्यांची हमीभावाने खरेदी करण्यात येईल, असेही केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली.

दिल्लीमध्ये देशभरातून आलेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधताना चौहान म्हणाले, यंदाच्या हंगामात शेतकऱ्यांच्या सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळाला. खाद्यतेलावर आयात शुल्क नसल्यामुळे सोयाबीनचे दर पडल्याचा आरोप होत होता. त्यामुळे खाद्यतेलावर आयातशुल्क वाढवून सोयाबीनच्या दराला आधार देण्याचा प्रयत्न केला. तरीही सोयाबीनच्या दरात अपेक्षित वाढ झाली नाही. जागतिक परिस्थितीमुळे सोयाबीनचे दर पडले आहेत.आता खरीप आणि रब्बी हंगामात उत्पादन होणाऱ्या कडधान्यांची हमीभावाने खरेदी करण्यात येईल. प्रामुख्याने उत्पादित होणारी तूर, उडीद आणि मसूर हमीभावाने खरेदी केली जाईल. त्यामुळे कडधान्यांना चांगला दर मिळाला.

### सोयाबीनला कमी दर मिळाला

देशातून तांदळाच्या निर्यात करण्यावर निर्बंध होते, आता तेही उठविले आहेत. यंदाच्या हंगामात गहू आणि तांदळाच्या खरेदीचे केंद्र सरकारने दिलेले उद्दिष्ट पूर्ण करू, असेही चौहान म्हणाले.हमीभावापेक्षा ४०० रुपये कमी मिळाले केंद्र सरकारने सोयाबीनला ४ हजार ८९२ रुपये हमीभाव जाहीर केला होता. प्रत्यक्षात खासगी बाजार आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधून ४,३०० ते ४,४०० रुपये दराने सोयाबीनची विक्री झाली आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल सरासरी ४०० रुपयांचे नुकसान झाले आहे. मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांना याचा सर्वाधिक फटका बसला आहे. शिवाय सरकारने हमीभावाने खरेदीचे निश्चित केलेले उद्दिष्टेही पूर्ण करता आले नाही. ३१ जानेवारी २०२५ पर्यंत खरेदी चालू राहणार असल्याने सोयाबीन खरेदीच्या आकडेवारीत मोठी वाढ दिसेल. तथापि, सोयाबीन खरेदीची मुदत वाढवण्याची गरज भासल्यास केंद्र सरकारकडे मुदत वाढवून मागितली जाईल, असेही रावल म्हणाले.राज्यात नाफेड व एनसीसीएफ अंतर्गत सहा राज्यस्तरीय नोडल एजन्सीच्या माध्यमातून सोयाबीन खरेदी सुरू आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची १ ऑक्टोबर २०२४ पासून नोंदणी सुरू केली होती.

---

# अंजली दमानियांनी घेतली अजित पवारांची भेट

## मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्याची केली मागणी

। कोल्हापूर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या करण्यात आल्याची घटना ९ डिसेंबर रोजी घडली. या घटनेमुळे राज्यात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणात पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. या घटनेतील आरोपी सध्या कोठडीत आहेत. तसेच या घटनेतील आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे.**

या बरोबरच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडवरही मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे. मात्र, मंत्री धनंजय मुंडे यांचा वाल्मिक कराड हा निकटवर्तीय असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्यात यावा, अशी मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे.बीड जिल्ह्यातील सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. आज अंजली दमानिया यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुंबईत भेट घेतली. यावेळी या भेटीत अंजली दमानिया यांनी अजित पवार यांच्याकडे मंत्री



धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी केल्याचं त्यांनी माध्यमांशी सांगितलं आहे. तसेच धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्या एकत्र कंपन्यांचे काही कागदपत्रही अजित पवार यांच्याकडे दिले असल्याचं अंजली दमानिया यांनी सांगितलं. तसेच उद्या अजित पवार यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असल्याचं आश्वासन अजित पवार यांनी दिल्याचंही अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे."उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबर मी २५ ते ३० मिनिटे चर्चा केली. त्यांचं म्हणणं असं होतं की बीडमध्ये जी घटना घडली ती घटना माणुसकीला काळिमा फासणारी आहे. त्या घटनेचं कुठेही समर्थन करत नाहीत. तसेच मी अजित पवारांना काही पुरावे दाखवले.

### धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी

कशा पद्धतीने धनंजय मुंडे, राजश्री मुंडे आणि वाल्मिक कराड यांचे एकत्र व्यवसाय आहेत? त्यांच्या कंपन्यामध्ये आर्थिक नफा कसा मिळतो? हे सर्व अजित पवारांना सांगितलं आहे. तसेच धनंजय मुंडेंचा राजीनामा कुठल्याही परिस्थिती घेतला पाहिजे हे त्यांना सांगितलं आहे", असं अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे."तसेच महाजनकोकडून त्यांना कसा नफा मिळतो? याचे काही कागदपत्रही अजित पवारांना दाखवले आहेत. बीडमध्ये असलेल्या दहशतीचे फोटो, रिल्स देखील त्यांना दाखवले आहेत. त्यांनंतर अजित पवारांनी मला असं सांगितलं की उद्या दुपारी १२ वाजता ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सविस्तर चर्चा करणार आहेत.

# वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर!

## दुरुस्तीत 14 बदल, विरोधकांच्या सूचना फेटाळल्या

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**वक्फ विधेयकातील बदलांना संसदेच्या संयुक्त समितीने सोमवारी मंजुरी दिली. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये 14 बदलांसह हे विधेयक संसदेत मांडण्यात आले होते. यापूर्वी भाजप खासदार जगदंबिका पाल यांनी 44 बदलांचा प्रस्ताव ठेवला होता, तो विरोधी सदस्यांनी फेटाळला होता. वक्फ (दुरुस्ती) विधेयकावरील संयुक्त संसदीय समिती आपला अहवाल अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सादर करणार आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात समितीचा कार्यकाळ वाढवण्यात आला होता.**



वक्फ मालमत्ता नियमित करण्याच्या उद्देशाने वक्फ कायदा 1995, चुकीचे व्यवस्थापन, भ्रष्टाचार आणि अतिक्रमण यासारख्या मुद्द्यांसाठी टीका केली गेली आहे. मसुद्यातील प्रस्तावित बदलांवर संशोधन करण्यासाठी पुरेसा वेळ दिला नसल्याचा दावा करत 24 जानेवारी रोजी दिल्लीत झालेल्या जेपीसीच्या बैठकीत विरोधकांनी गोंधळ घातला. दिल्ली निवडणुका डोळ्यासमोर ठेवून वक्फ दुरुस्ती विधेयकाचा अहवाल संसदेत लवकर सादर करण्याचा भाजप आग्रह धरत असल्याचा आरोप केला. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी म्हणाले की, समितीची कार्यवाही एक प्रहसन बनली आहे. समितीने बॅनर्जी-ओवेसी यांच्यासह 10 विरोधी खासदारांना एका दिवसासाठी निलंबित केले. जेपीसीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी बैठकीनंतर सांगितले की, समितीने स्वीकारलेल्या सुधारणांमुळे कायदा अधिक चांगला आणि प्रभावी होईल. मात्र, विरोधी खासदारांनी सभेच्या कामकाजाचा निषेध करत पाल यांच्यावर लोकशाही प्रक्रिया उद्ध्वस्त केल्याचा आरोप केला. टीएमसीचे खासदार कल्याण बॅनर्जी म्हणाले की, बैठकीची ही फेरी हास्यास्पद होती. आमचे म्हणणे ऐकून घेतले नाही. पाल यांनी हुकूमशाही पद्धतीने काम केले आहे. यावर जगदंबिका पाल यांनी ही संपूर्ण प्रक्रिया लोकशाही पद्धतीने असून बहुमताच्या मताला प्राधान्य दिल्याचे सांगितले. 24 जानेवारीच्या बैठकीनंतर जम्मू-काश्मीर हुरियत नेते मीरवाइज उमर फारूक म्हणाले, 'यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांना मनमानी अधिकार देण्यात आले आहेत. आदेश जारी करून व महसूल अभिलेखातील नोंदी बदलून वक्फ मालमत्तांना सरकारी मालमत्ता म्हणून दाखविण्याचे पूर्ण अधिकार दिले आहेत. या दुरुस्त्या पूर्णपणे मुस्लिम समाजाच्या विरोधात आहेत.या बैठकीत विरोधी पक्षांनी मांडलेल्या सर्व ४४ सुधारणा फेटाळण्यात आल्यामुळे विरोधकांवर अन्याय झाल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यावरही जगदम्बिका पाल यांनी उत्तर दिलं आहे. "या विधेयकावर प्रत्येक कलमानुसार चर्चा करण्यासाठी बैठक बोलावण्यात आली होती. यावेळी विरोधी पक्षांकडून मांडण्यात आलेल्या सर्व ४४ सुधारणा मी त्यांच्या नावासकट वाचून दाखवल्या. मी त्यांना विचारलं की त्यांना या सुधारणा सुचवायच्या आहेत का? त्यानंतर त्या मांडल्या गेल्या. ही प्रक्रिया याहून अधिक लोकशाही पद्धतीने होऊ शकली नसती", अस जगदम्बिका पाल म्हणाले."जर सुधारणा मांजल्या गेल्या आहेत आणि त्यांच्या बाजूने फक्त १० सदस्यांनी मत नोंदवलं आहे, तर मग अशा सुधारणा मंजूर होऊ शकतात का? संसद असो की संयुक्त संसदीय समिती असो, ही प्रक्रिया तितकीच नैसर्गिक आहे.

### किती लोकशाही पद्धतीने वागायचं?

वक्फ मालमत्ता नियमित करण्याच्या उद्देशाने वक्फ कायदा 1995, चुकीचे व्यवस्थापन, भ्रष्टाचार आणि अतिक्रमण यासारख्या मुद्द्यांसाठी टीका केली गेली आहे. मसुद्यातील प्रस्तावित बदलांवर संशोधन करण्यासाठी पुरेसा वेळ दिला नसल्याचा दावा करत 24 जानेवारी रोजी दिल्लीत झालेल्या जेपीसीच्या बैठकीत विरोधकांनी गोंधळ घातला. दिल्ली निवडणुका डोळ्यासमोर ठेवून वक्फ दुरुस्ती विधेयकाचा अहवाल संसदेत लवकर सादर करण्याचा भाजप आग्रह धरत असल्याचा आरोप केला. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी म्हणाले की, समितीची कार्यवाही एक प्रहसन बनली आहे. समितीने बॅनर्जी-ओवेसी यांच्यासह 10 विरोधी खासदारांना एका दिवसासाठी निलंबित केले. जेपीसीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी बैठकीनंतर सांगितले की, समितीने स्वीकारलेल्या सुधारणांमुळे कायदा अधिक चांगला आणि प्रभावी होईल. मात्र, विरोधी खासदारांनी सभेच्या कामकाजाचा निषेध करत पाल यांच्यावर लोकशाही प्रक्रिया उद्ध्वस्त केल्याचा आरोप केला.टीएमसीचे खासदार कल्याण बॅनर्जी म्हणाले की, बैठकीची ही फेरी हास्यास्पद होती.

# पोलीस बँडला राजभवनात प्रवेश नाकारला

## प्रजासत्ताक दिनीच मुख्यमंत्र्यांची राज्यपालांसोबत खडाजंगी!

। प्रयागराज ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री विरुद्ध राज्यपाल असा वाद पेटला आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त कोलकाता पोलीस पथकाच्या बँडला राजभवनाच्या बाहेर उभे केल्याने पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी संताप व्यक्त केला. पोलीस पथकाच्या बँन्ड ऐवजी बीएएसएफ पथकाने राजभवनात प्रदर्शन केले. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**

काही महिन्यांपूर्वी राजभवनाने कोलकाता पोलिसांकडून परिसरातील सुरक्षा नाकारली होती. त्याऐवजी राजभवनात केंद्रीय फौजा तैनात करण्यात आल्या आहेत. त्यामुळे या पोलीस पथकाच्या बँन्डलाही राजभवनात प्रवेश नाकारण्यात आला. प्रजासत्ताक दिनी ममत बॅनर्जी दुपारी ४ च्या सुमारास कार्यक्रमस्थळी पोहोचल्या. यावेळी पोलिसांचं बँड गेटवर थांबल्याचं त्यांच्या लक्षात आलं. त्यांनी याबाबत विचारलं असता पोलीस आतमध्ये कार्यक्रमात सामील होऊ शकणार नसल्याचं कळलं. याप्रकरणी त्यांनी तत्काळ कॅबिनेट सहकारी आणि शहराचे महापौर फिरहाद हकीम यांच्यासमवेत थेट राजभवनाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. या घडामोडीची माहिती मिळताच मुख्य सचिव मनोज पंत, गृह सचिव नंदिनी चक्रवर्ती, डीजीपी राजीव कुमार आणि नबन्नामधील इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.एका अधिकृत सूत्रानुसार, तृणमूल काँग्रेसच्या प्रमुखांनी त्यांना सांगितले की राज्याच्या मुख्यमंत्री आणि गृहमंत्री या नात्याने, राजभवनकडून पोलीस दलाला दिले जात असलेल्या या वागणुकीचा त्या वैयक्तिकरित्या निषेध करत आहेत. "कायदा आणि सुव्यवस्था हा राज्यघटनेतील राज्याचा विषय आहे आणि राजभवनाच्या प्रत्येक गरजेची राज्य सरकारकडून काळजी घेतली जाते, त्यामुळे अशी वागणूक पूर्णपणे अस्वीकार्य होती", अशी भूमिका ममता बॅनर्जींनी घेतल्याचं सूत्रांकडून समजले. टीम राजभवनने दावा केला की हे गैरसंवादातून निर्माण झालं आहे.



### ममता बॅनर्जींची नेमकी भूमिका काय?

किंवा समन्वयातील अडथळे आहेत आणि बँडला वगळण्याचा कोणताही हेतू नव्हता. दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीनंतर बँडला राजभवनाच्या आत त्यांचा परफॉर्मन्स ठेवण्याची परवानगी देण्यात आली. नंतर, कार्यक्रमस्थळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना, ममता म्हणाल्या, "आम्ही इतर बँडच्या प्रदर्शनावर आक्षेप घेत नाही, परंतु कोलकाता पोलिस बँडला वगळण्याचा प्रयत्न करणे अयोग्य होते. दरवर्षी, पारंपरिकपणे, कोलकाता पोलीस बँड या कार्यक्रमात सादर करतात.

# अहिल्यादेवी व लक्ष्मीने खेळली फुगडी



मालिकेतील कलाकार विविध निमित्ताने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसतात. सोशल मीडियावर त्यांचे अनेक व्हिडीओ पाहायला मिळतात. अनेकदा ट्रेंडिंग गाण्यावर कलाकार डान्स करताना दिसतात. आता मात्र दोन लोकप्रिय अभिनेत्रीने महाराष्ट्राचा पारंपारिक फुगडी खेळल्याचा व्हिडीओ सध्या प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. लक्ष्मी निवास(LAKSHAMI NIWAS) व पारू(PAARU) या मालिकांचा महासंगम आहे. या दोन्ही मालिका एकत्र दिसणार आहेत. या निमित्ताने दोन्ही मालिकेतील कलाकार एकत्र आले आहेत. लक्ष्मी निवास व पारू मधील दोन अभिनेत्रींचा हा व्हिडीओला प्रेक्षकांची पसंती मिळताना दिसत आहे.झी मराठी वाहिनीने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये ढोल-ताशाचा आवाज ऐकायला मिळत आहे. या तालाच्या गजरात अहिल्यादेवी व लक्ष्मी यांनी फुगडी खेळल्याचे पाहायला मिळत आहे. त्यानंतर त्यांनी त्यावर ठेकाही धरला आहे. झी मराठीने शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये अभिनेत्री मुग्धा कर्णिक यांना टॅग केले आहे. पारू मालिकेत मुग्धा कर्णिक यांनी अहिल्यादेवी किर्लोस्कर ही भूमिका साकारली आहे. लक्ष्मी निवास मध्ये लक्ष्मी ही भूमिका अभिनेत्री हर्षदा खानविलकर यांनी साकारली आहे. पारू मालिकेची लोकप्रियता मोठी असल्याचे वेळोवेळी पाहायला मिळते. तर काही दिवसांपूर्वीच प्रेक्षकांच्या भेटीला आलेल्या लक्ष्मी निवास या मालिकेनेही प्रेक्षकांच्या मनात जागा निर्माण केली आहे.नुकत्याच समोर आलेल्या प्रोमोत जयंत व अहिल्यादेवी समोरासमोर आल्याचे पाहायला मिळाले होते. पॅलेसवरून त्यांच्यात वाद निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले होते. लक्ष्मी निवास' या मालिकेत काही दिवसांपूर्वीच जान्हवी व जयंतचे लग्न ठरले आहे. त्यांच्या लग्नामुळे जान्हवीच्या घरातील सर्व जण आनंदात असल्याचे दिसत आहे. श्रीकांत व लक्ष्मी यांना जयंत हा जान्हवीसाठी योग्य वाटत असल्यामुळे तेदेखील आनंदात आहेत. दुसरीकडे पारू या मालिकेत अहिल्यादेवीने अनुष्का व आदित्यचे लग्न ठरवले आहे.

## रश्मिका मंदानाने तिच्या पायाच्या दुखापतीबद्दल दिली अपडेट

नॅशनल क्रश अशी बिरूद जिच्या नावामागे लागतात अशी अभिनेत्री रश्मिका मंदानाचे (RASHMIKA MANDANNA) 'ॲनिमल' आणि 'पुष्पा २: द रुल' या ब्लॉकबस्टर सिनेमांमुळे आजही कौतुक होते. या अभिनेत्रीचा लवकरच 'छावा' (CHHAVA) हा सिनेमा येणार आहे. मात्र, अलीकडेच जिम करताना तिच्या पायाला दुखापत झाली. २२ जानेवारी २०२५ रोजी तिच्या आगामी ऐतिहासिक नाट्यपट 'छावा'च्या ट्रेलर लाँचला ती सहभागी झाली होती. सुरुवातीला व्हीलचेअरवर आलेल्या रश्मिकाने नंतर मदतीने स्टेजवर लंगडत जात चित्रपटाचे प्रमोशन केले. रश्मिकाने नुकतीच इन्स्टाग्रामवर तिच्या दुखापतीविषयी अपडेट दिली आहे. तिने एक पोस्ट शेअर करत त्यात तिच्या दुखापतीविषयी माहिती दिली आहे. पोस्टच्या सुरुवातीला तिने महाराणी येसूबाईंची भूमिका साकारायची संधी मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली, पुढे तिने पोस्टमध्ये तिच्या दुखापतीबद्दल अधिक माहिती दिली.रश्मिकाने या पोस्टमध्ये तिच्या पायाला असलेल्या प्लास्टरचा लहान व्हिडीओ शेअर केला आहे. त्यावर तिच्या मैत्रिणींनी नक्षी काढल्या आहेत. तिने या फोटोसाठी कॅप्शन देत लिहिले, "हे सर्व क्यूट वाटत असले, तरी पायाला आतमध्ये तीन ठिकाणी फ्रॅक्चर झाले आहे आणि स्नायू फाटले आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून मी जमिनीवर पाय टेकवलेला नाही. मी स्वतःच्या पायांवर उभं राहणं खरंच मिस करतेय. कृपया स्वतःची काळजी घ्या. लोक जेव्हा काळजी घेण्याचा सल्ला देतात, तेव्हा ते हलक्यात घेऊ नका! तुम्हाला खूप प्रेम !"लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा' चित्रपटात रश्मिका मंदान्ना महाराणी येसूबाई यांची म्हणजेच छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नीची भूमिका साकारत आहे. चित्रपटात मुख्य भूमिकेत विकी कौशल असून, मराठा साम्राज्याच्या संघर्षांच्या पार्श्वभूमीवर आधारित कथा सादर केली गेली आहे. ट्रेलरला प्रेक्षकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

## कंगनाने सांगितला 'तो' किस्सा

बॉलीवूडची क्वीन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अभिनेत्री कंगना रणौत कधी वादग्रस्त विधानांमुळे तर कधी वैयक्तिक आयुष्यातील घटनांमुळे सोशल मीडियावर कायमच चर्चेत असतात. सध्या त्या चर्चेत येण्याचं कारण देखील तितकंच खास आहे. नुकतीच कंगना यांनी एक मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी नेहमीप्रमाणे बॉलीवूडवर टीका केली. तसंच आपल्या आजवरच्या चित्रपटाविषयी काही किस्से सांगितले. यावेळी कंगना यांनी 'मर्डर' चित्रपटासंबंधित एक किस्सा सांगितला.अभिनेत्री कंगना रणौत यांचा 'इमर्जन्सी' चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटाचं प्रमोशन करताना त्या दिसत आहेत. या चित्रपटानिमित्ताने कंगना यांनी राज शमानी यांच्या पॉडकास्टवर हजेरी लावली होती. यावेळी कंगना यांनी अनेक धमाल किस्से सांगितले. 'गँगस्टर' सिनेमातून कंगना यांनी बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. या सिनेमाच्या निर्मिती व दिग्दर्शनाची जबाबदारी अनुराग बासुने सांभाळली होती. या चित्रपटात कंगना इम्रान हाशमीबरोबर प्रमुख भूमिकेत झळकल्या होत्या. याच चित्रपटाबाबत सांगताना कंगना यांनी 'मर्डर' विषयी किस्सा सांगितला. त्या म्हणाल्या, "माझ्या घरच्यांना या इंडस्ट्रीबाबत फार माहित नव्हतं. जेव्हा मला अनुरागने 'मर्डर' सिनेमासाठी विचारणा केली. तेव्हा मी माझ्या वडिलांना सांगितलं की, 'गँगस्टर' ज्याने दिग्दर्शित केला आहे, तोच अनुराग 'मर्डर' सिनेमा करतोय आणि त्याने मला या सिनेमासाठी विचारलं आहे. हे ऐकताच माझे वडील खूप संतापले आणि थेट घरी यायला सांगितलं.



## फातिमाने सांगितला कास्टिंगचा अनुभव

दंगल गर्ल अशी ओळख असलेल्या फातिमा सना शेख या अभिनेत्रीने खरंत आत्तापर्यंत अनेक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. चाची ४२० हा बाल कलाकार म्हणून तिचा पहिला सिनेमा. त्यानंतर तिने दंगल या सिनेमात गीता फोगटची भूमिका निभावली. दंगल सिनेमानंतर कास्टिंग काऊचचा अनुभव कसा आला होता? हे फातिमाने आता एका मुलाखतीत सांगितलं आहे. फातिमा सना शेखने दंगलमध्ये केलेल्या भूमिकेचं कौतुक झालं होतं. त्यानंतर मात्र ती मोठ्या भूमिकेत दिसलेली नाही. आमिर खानच्या ठग्ज ऑफ हिंदुस्थान या चित्रपटातही फातिमा सना शेख होती. मात्र हीदेखील फार मोठी भूमिका नव्हती. अशात आता फातिमाने तिला आलेला कास्टिंग काऊचचा अनुभव सांगितला आहे.फातिमाने दंगल सिनेमानंतर ल्युडो, अजीब दास्ताँ, धक धक अशा चित्रपटांमध्ये काम केलं. मात्र दंगल नंतर तिला भूमिका मिळवण्यासाठी बरेच कष्ट घ्यावे लागले.

# ट्विंकल खन्नाचा संताप

अभिनेता अक्षय कुमार(AKSHAY KUMAR) हा सध्या त्याच्या स्काय फोर्स चित्रपटामुळे चर्चेत आहे. २४ जानेवारी २०२५ ला हा चित्रपट रिलीज झाला आहे. बऱ्याच काळानंतर अभिनेत्याच्या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे. अभिनेता त्याच्या चित्रपटांबरोबरच त्याच्या खासगी आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असतो. सोशल मीडियावर पत्नी ट्विंकल खन्ना(TWINKLE KHANNA)बरोबर फोटो शेअर करताना दिसतो. ट्विंकल खन्नादेखील तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असलेली दिसते. आता ट्विंकल खन्नाने पती व अभिनेता अक्षय कुमार बाबत केलेले वक्तव्य चर्चेत आहे. अक्षय कुमारने गेल्या वर्षी एका मुलाखतीत तो उजव्या विचारसरणीचा आणि ट्विंकल डाव्या विचारसरणीचा विचार करते, असे म्हटले होते.

# मला जे करायला हवे ते मी करतो!

## वैशालीचा उझबेकिस्तानच्या बुद्धिबळपटूने केला अपमान?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सध्या टाटा स्टील बुद्धिबळ टूर्नामेंट सुरू आहे. या टूर्नामेंटमध्ये घडलेली एक घटना चर्चेचा विषय ठरली आहे. भारताची ग्रँडमास्टर वैशाली हिला उझबेकिस्तानचा ग्रँडमास्टर नोडिरबेक याकुबोव्हने सामन्यापूर्वी तिला हस्तांदोलन करण्यास नकार दिला होता. यावरून चर्चेला उधाण आलं होतं. पण आता त्याने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत तिची माफी मागत हस्तांदोलन का केलं नाही यामागचे कारण सांगितले आहे.**




नोदिरबेक याकुबोव्हने भारताची मुलगी आणि ग्रँडमास्टर आर वैशालीशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला. नंतर जेव्हा त्याच्यावर टीका झाली तेव्हा त्याने हस्तांदोलन न करण्यामागे धार्मिक कारण असल्याचे सांगितले. मात्र टाटा स्टील बुद्धिबळ स्पर्धेत या मुद्द्यावरून वाद निर्माण झाला आहे. आता उझबेक ग्रँडमास्टरने माफी मागितली असून त्याचा उद्देश कोणाचाही अपमान करण्याचा नव्हता असे म्हटले आहे.चेसबेस इंडियाने सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये, याकुबोव्हविरुद्धच्या स्पर्धेच्या चौथ्या फेरीच्या सुरुवातीपूर्वी वैशालीने हस्तांदोलन करण्यासाठी आपला हात पुढे केला असल्याचे दिसत आहे, ज्याने सुरुवातीला हाताचा इशारा करून वैशालीला हस्तांदोलन करण्यास नकार दिला आणि नंतर तो खेळण्यासाठी बसला. हा प्रकार पाहून वैशाली देखील थोडी संभ्रमात पडली. २३ वर्षीय याकुबोव्ह जो २०१९ मध्ये ग्रँडमास्टर झाला होता त्याने हा सामना गमावला आणि सध्या आठ फेऱ्यांनंतर चॅलेंजर्स विभागात तीन गुणांवर आहे.हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर, याकुबोव्हने एक्स (पूर्वीचे ट्विटर) वर एक पोस्ट शेअर केली, ज्यामध्ये त्याने म्हटले की तो, वैशाली आणि तिचा लहान भाऊ आर. तो प्रज्ञानंदचा दर करतो, पण तो धार्मिक कारणांमुळे इतर स्त्रियांना स्पर्श करत नाही. “सामन्यादरम्यान वैशालीबरोबर घडलेली घटना मला सांगायची आहे. महिला आणि भारतीय बुद्धिबळपटूंचा आदर ठेवून, मी सर्वांना सांगू इच्छितो की मी धार्मिक कारणांमुळे इतर महिलांना स्पर्श करत नाही.”वैशालीनेही उझबेकिस्तानच्या खेळाडूला पराभूत केल्यानंतर हस्तांदोलन करण्यासाठी हात पुढे केला नाही. आठ फेऱ्यांनंतर भारतीय खेळाडूचे चार गुण झाले असून आणखी पाच फेऱ्या बाकी आहेत. याकुबोव्हने पुढे लिहिले, “मी वैशाली आणि तिचा भावाचा भारतातील एक उत्कृष्ट बुद्धिबळपटू म्हणून आदर करतो. माझ्या वागण्यामुळे जर तिला चुकीचं वाटलं असेल तर मी माफी मागतो.”यापुढे त्याने आपलं म्हणणं सांगताना सविस्तरपणे सांगितलं की, “मी काही अतिरिक्त स्पष्टीकरणे देऊ इच्छितो- १. बुद्धिबळ हराम नाही. मला जे करायला हवे ते मी करतो. २. मी या आधी जे केलं ते चुकीचं होतं (इथे याकुबोव्हने २०२३ मध्ये भारताची बुद्धिबळपटू दिव्या हिला हात मिळवला होता, त्याबद्दल सांगत ते चुकीचे केल्याचे त्याने म्हटले) ३. मी इतरांना विरुद्ध लिंगाच्या लोकांशी हस्तांदोलन करू नये किंवा महिलांना हिजाब किंवा बुरखा घालण्याची सक्ती करत नाही. काय करायचे ते ठरवणे ज्याच त्याचं काम आहे.”याकुबने पुढए सांगितले, “आज (रविवार) मी इरिना बुलमागाला याबद्दल सांगितले. ती देखील या सर्व बाबींशी सहमत होती, पण जेव्हा मी क्रीडादालनात आलो तेव्हा न्यायाधीशांनी मला किमान नमस्कार तरी करावा असे सांगितले. दिव्या आणि वैशालीबरोबरच्या सामन्यात, खेळाआधी मी तिला याबद्दल सांगू शकलो नाही आणि त्यामुळे एक विचित्र परिस्थिती निर्माण झाली. नोदिरबेक याकुबोव्हने भारताची मुलगी आणि ग्रँडमास्टर आर वैशालीशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला.

### ग्रँडमास्टरने माफी मागितली

हस्तांदोलन न करण्यामागे धार्मिक कारण असल्याचे सांगितले. मात्र टाटा स्टील बुद्धिबळ स्पर्धेत या मुद्द्यावरून वाद निर्माण झाला आहे. आता उझबेक ग्रँडमास्टरने माफी मागितली असून त्याचा उद्देश कोणाचाही अपमान करण्याचा नव्हता असे म्हटले आहे. चेसबेस इंडियाने सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये, याकुबोव्हविरुद्धच्या स्पर्धेच्या चौथ्या फेरीच्या सुरुवातीपूर्वी वैशालीने हस्तांदोलन करण्यासाठी आपला हात पुढे केला असल्याचे दिसत आहे, ज्याने सुरुवातीला हाताचा इशारा करून वैशालीला हस्तांदोलन करण्यास नकार दिला आणि नंतर तो खेळण्यासाठी बसला. हा प्रकार पाहून वैशाली देखील थोडी संभ्रमात पडली. २३ वर्षीय याकुबोव्ह जो २०१९ मध्ये ग्रँडमास्टर झाला होता त्याने हा सामना गमावला आणि सध्या आठ फेऱ्यांनंतर चॅलेंजर्स विभागात तीन गुणांवर आहे.हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर, याकुबोव्हने एक्स (पूर्वीचे ट्विटर)वर एक पोस्ट शेअर केली.

# ‘गेमचेंजर’ बुमराहची ऐतिहासिक कामगिरी

## आयसीसीचा पुरस्कार जिंकणारा भारताचा पहिला वेगवान गोलंदाज

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड कोणताही देश असो किंवा खेळपट्टी असो विकेटची १०० टक्के खात्रा म्हणजे जसप्रीत बुमराहची भेदक गोलंदाजी. आपल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघाच्या खेळाडूंना घाम फोडणाऱ्या बुमराहने आयसीसीचा पुरस्कार जिंकत इतिहास घडवला.**




जसप्रीत बुमराह २०२४ चा आयसीसी सर्वोत्कृष्ट कसोटी क्रिकेटपटू ठरला आहे. बुमराह हा पुरस्कार जिंकणारा भारताचा सहावा खेळाडू तर भारतीय संघाचा पहिलाच वेगवान गोलंदाज ठरला. बुमराहच्या आधी राहुल द्रविड (२००४), गौतम गंभीर (२००९), वीरेंद्र सेहवाग (२०१०), रविचंद्रन अश्विन (२०१६) आणि विराट कोहली (२०१८) यांनी हा पुरस्कार पटकावला होता. बुमराहने २०२४ मध्ये १३ कसोटी सामन्यांमध्ये सर्वाधिक ७१ विकेट घेत सर्वच गोलंदाजांना मागे टाकलं.जसप्रीत बुमराहसाठी २०२४ हे वर्ष खूप चांगले गेले. कसोटी क्रिकेटमध्ये तर बुमराहने ऐतिहासिक स्पेल टाकत सर्वांनाच चकित केले.२०२३ च्या अखेरीस पाठीच्या दुखापतीतून बरा झाल्यानंतर बुमराहने कसोटीत पुनरागमन केले आणि २०२४ मध्ये तो भारताचा सर्वात यशस्वी खेळाडूंपैकी एक राहिला. गेल्या वर्षी मायदेशात इंग्लंड आणि बांगलादेशविरुद्धच्या कसोटी संघाच्या विजयात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती. दुसरीकडे, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियामध्येही बुमराहने आश्चर्यकारक कामगिरी केली. जसप्रीत बुमराहने २०२४ मध्ये एकूण १३ कसोटी सामने खेळले. यादरम्यान त्याने १४.९२ च्या सरासरीने ७१ विकेट घेतल्या. गेल्या वर्षी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज बुमराह त्याच्याशिवाय इतर कोणत्याही गोलंदाजाला ६० विकेट्सचा आकडाही गाठता आला नाही.

### गेलं वर्ष माझ्यासाठी खूप खास

कसोटी इतिहासात एका कॅलेंडर वर्षात ७० अधिक विकेट्स घेणाऱ्या १७ गोलंदाजांपैकी कोणत्याच गोलंदाजाने बुमराहइतक्या कमी सरासरीने विकेट्स घेतलेल्या नाही. त्याच वेळी, बुमराह हा भारताचा फक्त चौथा गोलंदाज आहे ज्याने एका कॅलेंडर वर्षात ७० अधिक कसोटी विकेट घेतले आहेत.ICC टेस्ट क्रिकेटर ऑफ द इयर निवडल्यानंतर जसप्रीत बुमराह म्हणाला, “हा फॉरमॅट माझा सर्वात आवडता फॉरमॅट आहे. मला नेहमीच कसोटी क्रिकेट खेळायचे होते. गेलं वर्ष माझ्यासाठी खूप खास होतं.

## न्यू सिटी प्राईड इंग्लिश मीडियम स्कूलतर्फे

# सामूहिक संविधान उद्देशपत्रिका वाचन!

### शिक्षण विश्व : भारतीय संविधान अमृत महोत्सव निमित्त कार्यक्रम

**। पिंपरी-चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भारतीय संविधान अमृत महोत्सव निमित्त क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले एज्युकेशन फॉउंडेशन संचालित न्यू सिटी प्राईड इंग्लिश मीडियम स्कूलच्या वतीने स्वर्गीय बाळासाहेब कुंजीर मैदान या ठिकाणी सामूहिक संविधानच्या उद्देश पत्रिकेचे वाचन करण्यात आले.**






चिंचवड विधानसभा मतदार संघाचे आमदार शंकर जगताप, विधान परिषद सदस्य अमित गोरखे ,पिं. चिं. मनपा शहर कार्याध्यक्ष भाजपा शत्रुघ्न काटे व संस्थेचे संस्थापक अरुण चाबुकस्वार ह्यांचा हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले . या वेळी मा. क्रीडा सभापती चंद्रकांत अण्णा नखाते, मा. सभापती महिला बाल विकास समिती निर्मलाताई कुटे, उन्नती फाउंडेशनचे अध्यक्ष संजय भिसे, चॅलेंजर एज्युकेशन पब्लिक स्कूलचे अध्यक्ष संदीप काटे, कल्चरल फाउंडेशनचे अध्यक्ष विजय भिसे, एम.बी कॉम्पुटर चे प्रोप्रायटर मोहन भालेराव, उद्योजक राहुल भातकुले , सामाजिक कार्यकर्ते युवराज प्रगणे , शाळे चे उपमुख्याध्यापक सचिन कळसाईत, अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे मुख्याध्यापक दुलीचंद भोईर व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

इयत्ता पाचवी ते नववीचे विद्यार्थीही सहभागी झाले होते शाळेचा शिक्षिका पूजा देवगिरे , भावना देवरे, अनिता रोडे यांनी मराठी, हिंदी व इंग्लिशमध्ये संविधानाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली अण्णासाहेब मगर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनींनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वरती गीत गायले व एम.बी कॉम्पुटर चा वतीने इयत्ता १०वी च्या मुलांना परीक्षा पॅड व पेन प्रमुख पाहुनेच्या हस्ते देण्यात आले. नागरिकांमध्ये संविधानाची जनजागृती करण्यात आली. निशा पवार ह्याने संविधानच्या उद्देश पत्रिकेचे वाचन करून उपस्थितांना शप्पथ दिली व आभार उर्मिला ठोंबरे ह्यांनी मानले.

---

## प्रजासत्ताक दिन: संतपीठ शाळेत विविध कार्यक्रम

### जवानांच्या जीवनावर आधारित नाटिकेने उपस्थितांना अश्रू अनावर!

**। पिंपरी- चिंचवड।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पिंपरी-चिंचवड | पिंपरी चिंचवड महापालिकेच्या संत पिठामध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भारतीय जवानांच्या जीवनावर आधारित नाटकेने उपस्थित त्यांना अक्षरशः अश्रू अनावर झाले.**




जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँड ज्युनियर कॉलेज टाळगाव चिखली येथे शाळेच्या प्रांगणामध्ये भारताचा ७६वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

संचालक ह.भ.प. राजू महाराज ढोरे, संचालिका डॉ.स्वाती मुळे, प्राचार्य डॉ ज्ञानेश्वर गाडगे, मुख्याधपिका स्नेहल पगार, समन्वयिका मयूरी मुळूक, माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, दिनेश यादव, सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र यादव, चिंतन समिती सदस्य ज्ञानेश्वर तथा माऊली भांगरे, ह.भ.प युवराज शिंदे, विनायक आबा मोरे, अंकुशशेठ मळेकर उपस्थित होते.

ध्वज रोहनानंतर आर. एस.पी. च्या विद्यार्थी संचलन व स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी नाटिका सादर केली. प्राचार्य डॉ ज्ञानेश्वर गाडगे यांनी शाळेने केलेल्या प्रगती व भविष्यातील वाटचालीची माहिती सांगितली. यावेळी मयुरी फडके मराठी तर कार्तिक यादव इंग्लिश, आयुष कुमार हिंदी आणि अवनी रुपनवर हिने संस्कृत भाषेतून भाषण केले, सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सबसे उँची विजय पताका हे समूहगीत तर भारतीय जवानांच्या जीवनावर आधारित नाटिकेने प्रेक्षकांचे अश्रु अनावर झाले.

विद्यार्थी संचलनासाठी शाळेचे क्रीडा शिक्षक विजय भस्मे व सुधा खोले यांनी तर समूहगीतासाठी नेहा नाफडे, अविनाश भोगील, विवेक भालेराव तर नाटिका व नृत्यासाठी सविता गोडसे, गायत्री बारी, ईशा पटोळे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी अभ्यासाबरोबर खेळामध्ये विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या रितिका पाटील तसेच शाळेची साफसफाई सेवा देणाऱ्या व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया पाटील व सुवर्ण भोंगाळे तर शाळेच्या समन्वयिका मयुरी मुळूक यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले, वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# निगडी प्राधिकरणमधील संत ज्ञानेश्वर चौकात प्रजासत्ताक दिन उत्साहात

## माजी उद्यान अधिक्षक दत्तात्रय गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

निगडी प्राधिकरणमधील संत ज्ञानेश्वर चौकात ७६ वा प्रजासत्ताक दिन हा शिवतेज प्रतिष्ठान, निगडी यांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी उद्यान अधिक्षक दत्तात्रय गायकवाड उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करणेत आले. त्यानंतर राष्ट्रगीत गायन होऊन पेढे वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे आयोजन शिवतेज प्रतिष्ठान चे अध्यक्ष श्री. सुरेश वाडकर यांनी केले. यावेळी रविंद्र चौधरी, दिलीप गोसावी, सुनील म्हस्के, प्रफुल्ल पोटफोडे, गणेश वाडकर, नूर बागवान, कांताराम कशिद तसेच परिसरातील ज्येष्ठ नागरिक व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# लेझीमच्या प्रात्यक्षिकांमधून स्वातंत्र्य सैनिकांचे स्मरण!

## शिक्षण विश्व: अभिषेक विद्यालयम्; प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**अभिषेक विद्यालय शाहूनगर येथे भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर केले. तसेच विद्यार्थ्यांनी भाषणे केली.**





तसेच, डंबेल्स व रिंग्स यांचा वापर करून प्रात्यक्षिके सादर केली. विद्यार्थ्यांनी लेझीमच्या प्रात्यक्षिकांमध्ये विविध स्वातंत्र्य सैनिकांची वेशभूषा परिधान करून सादरीकरण केले, तसेच देशभक्तीपर समूहगीत सादर केले. निबंध स्पर्धेच्या माध्यमातून माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान, भारताची अस्मिता या विषयी आपल्या भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमास शाळेच्या व्यवस्थापकीय संचालिका गीता चरंतीमठ, सचिवमनीषा कसबे, गायत्री चरंतीमठ यांच्यासह सर्व विभागाच्या मुख्याध्यापिका, पालक वर्ग व विद्यार्थी तसेच शिक्षक वृंद उपस्थित होते.

---

# विद्यार्थ्यांकडून विविध कार्यक्रमातून तिरंग्यास मानवंदना!

## संत साई इंग्लिश स्कूल; जल्लोषपूर्ण वातावरणात प्रजासत्ताक दिन साजरा

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भोसरीतील जगद्गुरु महात्मा बसवेश्वर गुरुकुलच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा घेऊन, ढोल ताशे आणि बँड वाद्यांच्या गजरात जल्लोषपूर्ण वातावरणात देशभक्तीच्या घोषणाही दिल्या.**



कार्यक्रमाला संस्थापक अध्यक्ष शिवलिंग ढवळेश्वर उद्योजक आशिक शामानोर , विठ्ठल वाळुंज, शिक्षक पालक संघाचे अजित मेदनकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून भारत मातेच्या प्रतिमेचे पुष्पहार , धूप दीप समर्पित करून पूजन करण्यात आले. तसेच जगद्गुरु महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे सुद्धा यावेळी पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून रिटायर्ड लेफ्टनंट कर्नल ओमप्रकाश मसरकल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

शिक्षिका गुडिया सिंग यांनी प्रास्ताविक केले. श्वेता नारायणगावकर , शुभांगी काटे उपक्रमांची माहिती दिली. संस्थेच्या संचालिका सुनीता ढवळेश्वर , उपमुख्याध्यापिका रुपाली खोल्लम , प्राथमिक विभाग प्रमुख स्वाती मोघे, आरती मुदशेट्टीवार, मनोज वाबळे, संजय अनर्थे, काशिनाथ कतनाळी, प्रमोद शिंदे, भागवत वानखेडे, विठ्ठल पुंडे, अक्षय राणे, अनिता गव्हाणे, अरुणा कुंभार, सविता दाते, आरती लांडगे, गायत्री देवकर, मेघा पाटील यांची उपस्थिती होती.

# अर्थव्यवस्था वाढण्यासाठी शेती, शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक आवश्यक

## हर्षवर्धन पाटील : पिंपरी-चिंचवड विद्यापीठ: प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

देशाची अर्थव्यवस्था वेगाने वाढण्यासाठी उच्च तंत्रज्ञानाची जोड देऊन शेती आणि शिक्षण क्षेत्रात मोठी गुंतवणूक होणे आवश्यक आहे. यासाठी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) माध्यमातून कुशल मनुष्यबळ आणि सुसंस्कृत जबाबदार नागरिक घडवण्याचे काम मागील ३२ वर्षांपासून सुरू आहे असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी केले. साते, वडगाव मावळ येथे पिंपरी चिंचवड विद्यापीठात प्रजासत्ताक दिनानिमित्त हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, कुलगुरू डॉ. मणिमाला पुरी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपाडे, मार्केटिंग हेड जमीर शेख, सर्व विभाग प्रमुख, विद्यार्थी व पालक प्रतिनिधी उपस्थित होते.



# उज्वल भवितव्यासाठी कठोर परिश्रमाची कास अंगीकारावी

## उद्योजक मनीष शहा : प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट मध्ये 76 व्या प्रजासत्ताक दिनाचा वर्धापनदिन उत्साहात

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट मध्ये 76 व्या प्रजासत्ताक दिनाचा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने संस्थेच्या प्रांगणात प्रमुख पाहुणे जैन सोशल ग्रुपचे आंतरराष्ट्रीय संचालक व उद्योजक मनेष शहा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले .**



यावेळी संस्थेच्या कमला एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा प्रतिभा शहा, संस्थेचे संस्थापक ,सचिव डॉ. दीपक शहा, प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीचे प्राचार्य डॉ ए के वाळुंज उपप्राचार्या डॉ क्षितीजा गांधी, प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट चे संचालक डॉ सचिन बोरगावे, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ राजेंद्र कांकरिया, प्रतिभा ज्युनिअर कॉलेजच्या उपप्राचार्या डॉ वनिता कुऱ्हाडे, प्रतिभा शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ पौर्णिमा कदम, प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या वृंदा जोशी, प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल ( सोमाटणे शाखा ) च्या प्राचार्या पद्मावती विडप समवेत प्राध्यापक ,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालक ,विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी शाळेच्या उपप्राचार्या लीजा सोजू यांच्या मार्गदर्शनाखाली 150 हून अधिक विद्यार्थ्यांना सैनिकी वेशभूषा परिधान करून बँड पथका समवेत परेड करीत उपस्थित मान्यवरांना मानवंदना दिली प्रमुख पाहुणे जैन सोशल ग्रुपचे आंतरराष्ट्रीय संचालक व उद्योजक मनेष शहा यांच्या हस्ते महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी ,खेळाडू ,विशेष नैपुण्य मिळविलेल्या प्राध्यापकांना स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन त्यांच्या गुणगौरव करण्यात आला . उपस्थिता समोर विद्यार्थिनी समुहगान , योगा, मलखांब , देशभक्तिपर नृत्य, आदी सामूहिक नृत्याचे नेत्रदीपक सादरीकरण केले . उपस्थित त्यांनीदेखील त्याला उस्फूर्त प्रतिसाद दिला.

प्रमुख पाहुणे जैन सोशल ग्रुपचे आंतरराष्ट्रीय संचालक व उद्योजक मनीष शहा म्हणाले , आजचा विद्यार्थी उद्याचा सुजाण नागरिक आहे . सर्वानी देशाच्या विकासाला एकत्रित हातभार लावला पाहिजे. शिक्षणाबरोबर इतर पूरक कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे .येथील संस्थेतील तज्ञ प्राध्यापकांच्या मुळेच अल्पावधीतच या महाविद्यालयाने नावलौकिक मिळविला आहे.

### संविधानाचे प्रत्येकालाने पालन करावे...

संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा आपल्या मनोगतात म्हणाले , भारताने दिलेल्या संविधानाचे प्रत्येकालाने पालन करावे .आपला स्वतःचा विकास झाला तरच देशाचा विकास होणार आहे . जगात स्पर्धेच्या युगात नवनवीन तंत्रज्ञान येत आहे . विद्यार्थ्यांनीही बदलत्या तंत्रज्ञानानुसार ज्ञान आत्मसात करून येणाऱ्या स्पर्धेत स्वतःला सिद्ध करण्याचा संकल्प करावा. त्यासाठी प्राध्यापकांनी देखील विद्यार्थ्यांना सजग करण्याची भूमिका पार पाडावी. पूर्वी शिक्षक बोलणे, वाचन, फळा , खडू द्वारे विद्यार्थीना घडवीत होते . आता बदलत्या युगात स्मार्ट बोर्ड द्वारे शिक्षण प्रणाली विकसित झाली आहे .नाविन्याची कास प्राध्यापकांनी अंगीकारून विद्यार्थ्यांना खडू, फळा, वाचना बरोबरच नवीन जगाची ओळख विद्यार्थ्यांना करून द्यावी. देशाप्रती प्रेम प्राध्यापकानी विद्यार्थ्यांमध्ये बिंबवण्याचे आवाहन देखील यावेळी त्यांनी केले.



जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर विविध शिक्षण , कला , क्रिडा , सामाजीक जनजागृती क्षेत्रात विद्यार्थ्यांनी यशस्वी झेप घेत वैयक्तिक कामगिरी बजावत पारितोषिके देखील मिळविले आहे. तुम्ही सर्वजण नशीबवान आहात या संस्थेत शिक्षण घेत आहात संस्थेचे संचालक डॉ. दीपक शहा नेहमीच हुशार होतकरू विद्यार्थ्यांना कमवा व शिका अंतर्गत आर्थिक मदत देत आहे. त्याना त्याच्या आवडीचे वेगवेगळे प्रशिक्षण नामांकित कंपन्यांबरोबर करार करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे काम करीत आहे . विविध कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देत, त्यांना त्यांच्या पायावर उभे करीत आहे ही कौतुकास्पद बाब आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा वैशाली देशपांडे यांनी केले.

पारितोषके वाचन प्रा सुकन्या बॅनर्जी यांनी तर आभार उपप्राचार्या डॉ वनिता कुऱ्हाडे यांनी मानले . ध्वजारोहण समारंभ समितीचे डॉ आनंद लुंकड प्रा शबाना शेख, पी टी इंगळे, डॉ अभय पोद्दार, संदीप शहा यांनी विशेष सहकार्य केले.


DP Enterprises
one call problem solve
PEST CONTROL
ELECTRICIAN
PAINTING
PLUMBING
All Maintenance Services
Pimpri-Chinchwad, Pune.
PRICE
QUALITY
SERVICE
we provide all types of home services.
CONTACT :- 86000 60593 / 99214 66191

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्यावतीने प्रजासत्ताक दिन साजरा

## मानवी हक्क संरक्षण आणि जाग्रतीचे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड यांच्या हस्ते ध्वजारोहण

**। पिंपरी-चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

संत तुकाराम नगर येथील महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण ह.भ.प शामराव गायकवाड व मानवी हक्क संरक्षण आणि जाग्रतीचे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी केंद्र संचालक अनिल कारळे, विकास कुचेकर, सुशीला जाधव, कुसुम मोरे, साहित्यिक सुरेश कंक, कामगार प्रतिनिधी किरण देशमुख, गुणवंत कामगार संगिता जोगदंड, सुदाम शिंदे, मानवी मानवी हक्क संरक्षण जागृतीच्या महिला अध्यक्षा संजना करंजावणे, सुरेखा मोरे, काळुराम लांडगे, प्रकाश घोरपडे, हभप यादव तळले, चंद्रकांत लवाटे, शहाजी दौंडकर, श्रीराम गवसकर, उपस्थित होते. समृद्धी क्षीरसागर, आकांक्षा मिरजकर, सुरेखा चंद्रकांरी यांचा सत्कार करण्यात आला.



